# वाढत्या तापमानात नव्या, जुन्या बागेतील व्यवस्थापन

**द्राक्ष सल्ला**

डॉ. आर. जी. सोमकुंवर

**सध्याच्या परिस्थितीमध्ये द्राक्ष बागेमध्ये कमाल तापमान वाढताना दिसून येते. यासोबत किमान तापमानातही तशीच वाढ दिसत आहे. परिणामी, बागेतील आर्द्रता वेगाने कमी होत असून, वेगवेगळ्या वाढीच्या अवस्थेतील बागांमध्ये काही अडचणी उद्‌भवू शकतात. त्यावरील उपाययोजनांची माहिती घेऊ.**


## नवीन बाग

या बागेमध्ये रिकट घेऊन काही ठिकाणी जवळपास सात ते आठ पानांच्या फुटी दिसतील. आपण रिकट घेतल्यानंतर जवळपास चार ते पाच डोळ्यांना हायड्रोजन सायनामाईडचे पेस्टिंग केले होते. सर्वच डोळे फुटून फुटींची वाढ होण्यास सुरुवात झाली असेल. या वेळी सर्व फुटी तशाच राखल्यास एकही फूट व्यवस्थित वाढणार नाही. आपल्याला वेलीचा सांगाडा तयार करण्यासाठी सुरुवातीला खोड तयार करणे महत्त्वाचे असेल. यासाठी सरळ सशक्त आणि रोगमुक्त वाढत असलेली फूट निवडणे गरजेचे असेल. द्राक्षवेलीमध्ये

'शेंड्याचे प्रभुत्व' (अपायकल डॉमिनन्स) आढळून येते. म्हणजेच उपलब्ध फुटींपैकी पहिली, तिसरी व पाचवी फूट जोमात चालेल. तर दुसरी, चौथी आणि सहावी हळू चालेल. खोड तयार करण्याकरिता वरील फुटीचा शेंडा तीन ते चार पानांवरती खुडून दुसऱ्या क्रमांकाची फूट बांबूला बांधून सरळ वाढू द्यावी. इतर फुटी तीन ते चार पानांच्या अवस्थेत खुडून घ्याव्यात. जवळपास एक महिन्यापर्यंत कोणत्याही फुटी तळातून काढू नये. कारण कधी बांबूला बांधताना, वळण देताना जर ही फूट तुटली तर आपल्याला खालील फुटींचा वापर करता येतो. खोड तयार करते वेळी 'थांबा व पुढे चला' (स्टॉप अॅण्ड गो) या पद्धतीचा वापर करावा. यामध्ये नवीन निवडलेली फूट ९ ते १० पानांची झाल्यानंतर सहा ते सात पानावर खुडून घ्यावी. वाढत्या तापमानात फुटींचा जोम जास्त असल्यामुळे एक आठवड्यामध्ये इतर डोळ्यांमधून बगलफुटी निघताना दिसतील. शेंडा खुडल्यानंतर लगेच त्या डोळ्यामधून निघालेली फूट वर बांबूला बांधून घ्यावी. त्याखालील सर्व बगलफुटी तीन ते चार पानावर खुडून घ्याव्यात. ही पाने प्रकाश संश्लेषणाच्या माध्यमातून अन्नद्रव्ये तयार करतील. ते सर्व त्या काडीमध्ये गोळा होईल. त्यामुळे ती काडी जाड होण्यास मदत होईल. अशा प्रकारे खोड तयार होण्याचा पहिला टप्पा पूर्ण होईल. तयार होत असलेले खोडही जाड होईल. वर बांधलेली फूट पुन्हा १० ते १२ पानांवर गेल्यानंतर ८-९ पानांवर खुडून घ्यावी. पहिल्या टप्प्याप्रमाणेच नियोजन करावे.

बागेत फुटींची वाढ होण्याकरिता अन्नद्रव्य आणि पाणी व्यवस्थापन तितके महत्त्वाचे असेल. अन्नद्रव्यांपैकी नत्रांचा वापर या वेळी गरजेचा असतो. यापैकी युरिया, अमोनिअम सल्फेट व १८-४६-० या खतांचा वापर फायदेशीर ठरेल. डॉगरीज खुंटावर कलम केलेल्या बागेमध्ये पहिल्या वर्षी फेरसची कमतरता जास्त जाणवते. यामुळे पाने सुरुवातीपासूनच पिवळी पडलेली दिसतात. या पानांमध्ये हरितद्रव्य कमी झाल्यामुळे प्रकाश संश्लेषण कमी होते, अन्नद्रव्याचा साठा अपेक्षेप्रमाणे होत नाही. मुळातच वेलीची वाढ होत नसल्यामुळे फुटीचा पेरा आखूड राहतो व खोड तयार होण्यास विलंब लागतो. ही परिस्थिती टाळण्याकरिता बागेत खोड तयार करण्याचा पहिला टप्पा संपताच किंवा ९-१० पाने तयार झाल्यापासून फेरस (चिलेटेड किंवा सल्फेट स्वरूपात) फवारणी करावी. ही फवारणी प्रत्येक आठ दिवसानंतर करत जावी. यासोबत जमिनीतून १० ते १२ किलो फेरस सल्फेट द्यावे.

भारी जमिनीमध्ये पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असल्यामुळे मुळांच्या कक्षेमध्ये पाणी राहून बोद वाफसा स्थितीत राहील, याची खात्री करावी. जास्त पाणी झाल्यास मुळे काळी पडण्याची शक्यता असते. हलक्या जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी असेल. कमी प्रमाणात पण जास्त वेळा विभागून पाणी द्यावे. पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढवण्यासाठी बोदामध्ये किंवा ड्रीपरच्या खाली शेणखत, कोकोपीट किंवा बगॅसचा वापर करावा. जास्त तापमान वाढत असलेल्या व कमी पाणी असलेल्या बागेमध्ये बोदावर आच्छादन करणे गरजेचे समजावे. ज्या ठिकाणी पाणी कमी आहे, अशा बागेमध्ये एकतर सकाळी किंवा सायंकाळी पाणी द्यावे.



स्टॉप अॅण्ड गो पद्धतीने तयार केलेले खोड.



नवीन द्राक्ष बागेमध्ये केलेले प्लॅस्टिक आच्छादन.



उन्हाळ्यामध्ये द्राक्षबागांमध्ये पाचटाचे केलेले आच्छादन.

## जुनी बाग

बऱ्याच ठिकाणी द्राक्ष बागेमध्ये फळ काढणीचा महत्त्वाचा कालावधी सुरू आहे. फळ काढणीचा कालावधी व बागेतील तापमान यांचा जवळचा संबंध असतो. द्राक्षांची प्रत टिकवून ठेवण्याकरिता बागेत फळ काढणी कमी तापमानात करणे गरजेचे असेल. साधारणतः सकाळी अकरा वाजेपर्यंत फळ काढणी केल्यास द्राक्ष घड व त्यातील प्रत्येक मणी ताजातवाना राहण्यास मदत होईल. या वेळी तापमान २५ अंश सेल्सिअसपर्यंत असेल. आर्द्रतासुद्धा जास्त असेल. अशा परिस्थितीत मण्यातून पाणी निघून जाण्याची शक्यता कमी असते. फळ काढणी जितकी उशिरा करू, तितके तापमान वाढेल. मणी, देठ व घडाचे दांडे यातून पाणी निघून गेल्यामुळे मणी सुकल्यासारखे दिसतील. देठही काळसर पडू लागतील. घड लूज झाल्याचे जाणवेल. त्यामुळे घडात पाहिजे तितका अन्नद्रव्यांचा साठा नसल्यामुळे ग्राहकांची पसंती मिळणार नाही.

- बऱ्याचदा बागायतदार फळ काढणीच्या एक आठवड्यापासून बागेत पाणी कमी करतात किंवा बंद करतात. त्यामागे मण्यांची गोडी वाढून फळ काढणी लवकर करता येईल, हा उद्देश असतो. जमिनीच्या प्रकारानुसार वेलीला पाण्याची गरज असते. यामध्ये पाण्याचा ताण अधिक बसल्यास गोडी वाढली तरी काही परिस्थितीत मणी घडापासून वेगळे होऊ शकतात. वेलीला पाण्याचे नियोजन करताना घडामध्ये गोडी येण्यासोबतच मण्याची देठाशी असलेली पकड व्यवस्थित राहील, इतपत पाणी दिले पाहिजे. साधारणपणे या वेळी मण्याच्या विकासासाठी या पूर्वी देत असलेल्या पाण्याच्या ७५ टक्क्यांपर्यंत पाणी द्यावे. यासोबत आपल्या बागेतील तापमान व जमिनीचा प्रकार (हलकी, भारी जमीन) आणि वेलीवर असलेली कॅनॉपी (पूर्ण कॅनॉपी व अर्धी क्रॅनोपी) यांचा विचार करून पाण्याचे प्रमाणाचा निर्णय घ्यावा.
- या वेळी तापमान वाढत असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव दिसणार नाही. तेव्हा विनाकारण बुरशीनाशकांची फवारणी करणे टाळावे.
- बऱ्याचशा बागेत मण्यामध्ये गोडी कमी जास्त असल्याचे दिसून येते. नाशिक भागामध्ये अजूनही किमान तापमान ९ अंश सेल्सिअसपर्यंत असल्याचे शेतकरी सांगतात. कॅनॉपी जास्त दाट असणे, भारी जमीन व किमान तापमानात घट होणे अशा कारणांमुळे मण्यात गोडी कमी अधिक दिसून येते. त्यामुळे फळ काढणीचा कालावधीसुद्धा जवळपास १० ते १५ दिवसांनी वाढतो. अशा बागेत गोडी वाढविण्यासाठी पाण्यावर नियंत्रण महत्त्वाचे असेल. (जमिनीच्या प्रकारानुसार व उपलब्ध कॅनॉपी यांनुसार नियोजन आवश्यक.)
- काही परिस्थितीत घडावर सूर्यप्रकाश पडेल, यासाठी कॅनॉपी व्यवस्थापनात थोडीफार दुरुस्ती करावी लागेल. या वेळी एकतर घडाच्या जवळपासच्या क्षेत्रातील पाने कमी कराव्या लागतील किंवा काही वेळा फुटीही बाजूला कराव्या लागतील. या वेळी यापेक्षा फारसे काही करता येईल असे नाही. या सोप्या उपाययोजनेसोबत पालाशची उपलब्धता फायद्याची ठरू शकेल. त्यासाठी ०-९-४६, सव्वा किलो प्रति एकर किंवा ०-०-५०, एक किलो प्रति एकर या प्रमाणे चार ते पाच वेळा द्यावे.

- डॉ. आर. जी. सोमकुंवर, ९४२२०३२९८८, (राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट अॅग्रेस्कोप्राप्त आहेत.
- फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे.
- खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे.
- बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे.
- लेबल क्लेम वाचावेत.
- पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत.
- रसायनांचा गट तपासावा.
- पीएचआय, एमआरएल तपासावेत.
- पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

**मधमाशी, मित्रकीटकांना हानिकारक कीडनाशकांचा वापर टाळावा.**
**पीक फुलोरा अवस्था लक्षात घेऊन कीडनाशकांचा समंजस वापर करावा.**